
# पुणे महानगरपालिका
# पर्यावरण अहवाल
# १९९६–१९९७



राष्ट्र महानगरपालिका व नगरपालिका (सुधारित)

कायदा १९९४ अन्वये.

# पुणे म.न.पा.च्या पर्यावरण अहवालासंबधी

जनतेची आर्थिक सुधारणा त्यांच्या शहरांवर अवलंबुन असते व शहरांची सोयी सुविधांची व्यवस्थापना नीट नसली की, शहरातील लोकांचे आरोग्य व पर्यावरणावर त्याचा ताण पडतो. भारतातील बहुतेक शहरात पर्यावरणाचा ऱ्हास झालेला दिसतो. पिण्याच्या पाण्याची स्थिती, कचऱ्या संबधी समस्या, हवेचे प्रदुषण, रस्त्यावरील अपघात, वाढती लोकसंख्या व घरांची समस्या इत्यादी पर्यावरण संबधी गोष्टी अेकमेकांशी निगडीत आहेत वरील गोष्टींचा ताण सर्व लोकांवर पडतो व त्यांचे आरोग्य, रहाणीमान, उत्पादन क्षमता उत्पन्न इत्यादीवर त्याचा परीणाम जाणवतो.

भारताच्या स्वातंत्र्योत्तर काळात शहरीकरणाची प्रक्रिया फार वाढली जलद शहरीकरणासमोर मुख्य प्रश्न आहे की शहरीकरणा बरोबर आर्थिक प्रगती व पर्यावरण संबधी तसेच इतर सामाजिक प्रश्न बरोबरीनेच सोडवता आले पाहिजेत. पर्यावरणाचे प्रश्न सोडवणे म्हणजे आरोग्य, रहाणीमान संबधी सर्व प्रश्नाचे उत्तर शोधने. हे प्रश्न सोडवितांना, नगर रचनाकारांना नगरपालिकेतील नगरसेवक तसेच व्यवस्थापनातील अधिकाऱ्यांना बऱ्याच गुंतागुंतीच्या परिस्थितीस सामोरे जावे लागते. अनेक वेळी योग्य प्रश्नावेळी तयार करणे व त्यांचा अग्रक्रम लावणे फार अवघड होऊन जाते. *त्यासंबधी निर्णय* घेताना सर्व समस्यांचा सारासार विचार करताना इतर आर्थिक, सामाजिक बाबीची काळजी घेणे फार महत्वाचे होते.

सामाजिक आरोग्य व शहरवासीयांचे रहाणीमान ह्या अेकमेकांशी निगडीत अशा बाबी आहेत. वेळोवेळी पर्यावरण अहवाल बनविल्याने काही विचार करावयास लावणारे निष्कर्ष डोळ्यासमोर येतात. पुणे महानगरपालिका ही महाराष्ट्रातील अेक अशी महानगरपालिका आहे की 1996 साली आपला पाहिला पर्यावरण अहवाल वेळेवर तयार करुन घेतला होता. अशा प्रकारचा अहवाल करणे ही महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपालिका (सुधारीत) कायदा 1994 कलम 67 अ अन्वये आवश्यक आहे. गेल्या वर्षी बनविलेल्या पर्यावरण अहवालाची वर्तमानपत्रात, नगरसेवकांमध्ये व आम जनतेत बरीच चर्चा झाली बऱ्याच लोकांनी सदर अहवाल महानगरपालिकांच्या कडून विकत घेऊन त्यावर टिपण्णी केली महानगरपालिके अधिकारीवर्गास देखील आपल्या कामाच्या अग्रक्रमाची यादी बनवण्यास त्याचा उपयोग झाला.

ह्या वर्षी पुणे महानगरपालिका दुसऱ्यांदा पर्यावरण अहवाल तयार करित आहे व

त्यासाठी रॅपीड इन्हायरमेंटल ॲसेसमेंट ह्या तंत्राचा वापर करीत आहे ह्यामुळे अहवा फक्त सद्यःपरीस्थिती देऊन न थांबता, अतिमहत्वाचे कार्यक्षेत्र व त्यावर घेता येणा कामासंबधी सदर अहवाल दिशा दाखवते. हा अहवाल बनविण्यासाठी मशाल संस्थे मोलाचा सहभाग आहे.

**लोकसंख्येसंबधी सद्यःस्थीती :**

स्वातंत्र्यानंतर पुणे शहरातील लोक संख्या वाढीचा दर प्रतीवर्षी 2.2 ते 3.5 टव ऐवढा होता. 1981 च्या जणगणने नुसार पुणे शहरात 75 मतदान वार्ड होते ज्य 1991 मध्ये वाढ होऊन 85 झाले. नंतर वार्डस्तरीय कार्यक्षम व्यवस्थापनासाठी ( वार्डाची विभागणी करुन वार्ड संख्या 111 वार्डस ऐवढी करण्यात आली. अतिंमतः गे वर्षी वार्ड संख्येत वाढ होऊन 124 वार्ड अस्तित्वात आले आहेत. क्षेत्रफळ आणि वार्डा सिमेंतर्गत होणारी लोकसंख्या वाढ लक्षात घेता वार्ड रचनेत असा बदल करणे गरजे होते हे आपणास पुढील उदाहरणावरुन लक्षात येईल, औध विभागात सर्वात कमी लो संख्या म्हणजे 49.07 व्यक्ति प्रति हेक्टर एवढीच असता, त्याच वेळी कसबा आ भवानी पेठ विभागात लोकसंख्या 678 ते 645 व्यक्ति प्रति हेक्टर ऐवढी जास्त आ तसेच शहराच्या बाह्य भागातील लोकसंख्या 49 ते 151 व्यक्ती प्रति हेक्टर एवढी आ

आणि आता पुणे म.न.पा. च्या नियोजनानुसार नवीन 36 गावे महानगर पालिके समाविष्ट केली जात आहेत. मागील दशकात ह्या गांवातील लोकसंख्या वाढ प्रतिवर्षी 6 एवढी होती. सदरिल गावे महानगर पालिकेत समाविष्ट झाल्यामुळे म. न. पा. कार्यक्षेत्रात दुपट्टीने वाढ होऊन, त्यासाठी लागणाऱ्या सोई सुविधा सुद्धा वाढवाव्या लाग आहेत.

**जमीनीचा वापर :**

शहरी क्षेत्रातील पर्यावरणावर प्रामुख्याने दोन बाबीचा प्रादुर्भाव होत असतो, त्या एक म्हणजे जमीनीचा विविध बाबीसाठी होणारा वापर आणि दोन, अंगभुत सोयी सु ा जमिनीचा वेगवेगळया कारणासाठी वेगवेगळा एकत्रित वापरामुळे गोंधळाची परिस्थि निर्माण होत असते. जमीन वापरा संबधी सार्वजनिक खात्या मार्फत बंधने घालण्यात असतात जेणे करुन पर्यावरणाचा आणि सार्वजनिक आरोग्याचा उच्च दर्जा राखणे श होते. जमीनीचा औद्योगिक व रहिवासी कारणासाठी एकत्रीत वापर देखील टा आवश्यक आहे. अस्तित्वात असलेल्या जमीन वापराच्या नमुन्याचा काळजी पुर्वक अ

करुन नव्याने वापरा संबधी सुचना करणे हितावह हाणारे आहे.

मोठया प्रमाणावर जमिन वापराचे नियोजन करतांना निवासी क्षेत्राचे नियोजन करणे अवघड बाब आहे. सार्वजनिक संस्था ह्या निवासी क्षेत्राच्या उन्नतीच्या दृष्टीने काम करत असतात. खाजगी क्षेत्रातुन देखील ह्या दष्टीने प्रगत्न होत असतात. पण खाजगी क्षेत्र निवासी सुविधा किंवा घरे पुरविण्यास असमर्थ ठरल्या आहेत. ज्यामुळे एकुण लोकसंख्ये पैकी 41% लोक हे दुय्यम दर्जाच्या घरातुन रहात आहेत म्हणूनच अशा विभागासाठी पाणी पुरवठा, सार्वजनिक शौचालय इ. सोयी पुरविणे गरजेचे आहे. अशा महत्वपुर्ण भागाना आवश्यक सोयी सुविधा पुरवितांना त्याभागातील पुरेशी माहिति उपलब्ध न झाल्यास अडचणीचे ठरते.

## निवासी क्षेत्र :

निवासी क्षेत्र हा शहराच्या नियोजनातील महत्वाची आणि तितकीच अवघड बाब होय. मागील काही दशकात घर बांधणी क्षेत्रात झालेले बदल आणि वाढ ही लक्षणीय आहे. उदा. दगड मातीत बांधलेली घरे ते आर.सी.सी.फ्रेम्ड स्ट्रक्चर पासुन ते विशेष करुन मालकी तत्वावर बांधल्या जाणाऱ्या ईमारती पर्यंत शहराच्या जुन्या वस्तीमधील बरेच वाडे पाडून तेथे 2.37 चटई क्षेत्र निर्देशांकानुसार नवीन ईमारती उभ्या राहिल्या आहेत. वाढत्या बांधकामामुळे व वाढीव चटई निर्देशांकामुळे शहराच्या मध्यवस्तीत जनसंख्येचे प्रमाण खुपच वाढले आहे. ज्यामुळे म.न.पा.ने विकास हक्क हस्तारंरणची सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. जेणे करुन वाढीव बांधकाम दाट लोकवस्तीचा क्षेत्रात न होता कमी लोक वस्ती असलेल्या क्षेत्रात होईल.

म.न.पा.च्या बांधकाम नियंत्रण विभागाकडे येणाऱ्या गृह बांधणी प्रस्तावा संख्या खुपच कमी झाल्याचे आढळून आले आहे. तदवतच निवासी क्षेत्र वापराचे प्रमाण देखील कमी झाल्याचे आढळून आले आहे.

वाढती लोकसंख्या पाहता निवासी क्षेत्रात पुरशी घरे उपलब्ध होत नाहीत जेणे करुन आगामी काळात घराची टंचाई तिव्रतेने जाणवणार आहे. कोंढवा तसेच कोथरुड, बिबवेवाडी, नगर रोड, औध इत्यादी भागात बिल्डर्स, डेव्हलपर्स यांनी बरीच बांधकामे केली.

निवासी क्षेत्रासाठी व घर बांधणीस सहाय्यक ठरणाऱ्या खालील अनेक उपाय योजना

पुणे म.न.पा. अमलांत आणित आहे.

1 शेती खालील क्षेत्राचे निवासी क्षेत्रात रुपांतर

2 मध्य वस्तीतील चटई क्षेत्र निर्देशांक कमी करुन एकाच ठिकाणी होणारी दाट वस्ती टाळणे.

3 औद्योगीक क्षेत्रासाठी राखीव असणाऱ्या क्षेत्राचे निवासी क्षेत्रात रुंपातर करणे

4 वीट भट्टयासाठी राखीव असणारे क्षेत्र निवासी क्षेत्रात बदलणे

5 प्रत्येक इमारतीखाली स्टिल्ट वाहन तळ

वाढती वाहन संख्या लक्षात घेउन नियोजित ईमारतीस स्टिल्ट मजला अनिवार्य करुन वाहन तळासाठी जागेची उपलब्धता करणे अनिवार्य करंण्यात येणार आहे. ज्यामुळे रस्त्यावर वाहने उभी करण्याचे प्रमाण कमी होउन वाहतुकीस अडथळे येणार नाहीत. स्टिल्ट मजल्यामुळे आच्छादित वाहन तळ होऊन इमारतीच्या भोवतालची उर्वरीत जागा वृक्षारोपणास किंवा बागेसाठी वापरता येईल.

**विकास नियमावलीतील बदल :**

विकास नियमावलीत बदल करताना लोक वस्तीचे विकेंद्रिकरण करणे हा महत्वाचा मुद्दा लक्षात घेऊनच बदल सुचविण्यात आले आहेत. त्या द्येष्टिने विकास हक्काचे हस्तांतरण नियम पुणे म.न.पा.च्या विकास नियमावलीत समाविष्ट करण्यात आला आहे. सदर नियम खाजगी मालकीच्या (सार्वजनिक उपयोगासाठी आरक्षित आणि ऐनिहासिक इमारती जमीनीच्या संदर्भात आहे. म्हणजेच जर एखाद्या व्यक्तिची जागा हि दाट लोकस्तीच्या क्षेत्रात असेल तर तो तेवढयाच क्षेत्रफळाच्या विकास इतरत्र करु शकतो सद्य स्थितीत सार्वजनिक संस्थेस अशी जागा ताब्यात घेऊन तिचा सार्वजनिक उपयोगासाठी विकास करणे कठिणच आहे अशा परिस्थितीत सदर नियमामुळे खुपच मदत होणार आहे. जेणे करुन सार्वजनिक उपयोगासाठी जास्तीत जास्त क्षेत्र उपलब्ध होणार आहे.

विकास हक्काचे हस्तांतरणे नियमावली अंतर्गत पुणे म.न.पा.क्षेत्राचे एकुण तीन विभाग पाडले आहेत (अ विभाग ब विभाग व क विभाग) सदरहु विभाग हे त्या त्या विभागातील झालेल्या विकांसानुसार पाडले गेले आहेत. शहरातील दाट लोक वस्तीचा भाग हा अ विभाग तर म.न.पा.च्या हद्दी जवळील क्षेत्र क विभागात समाविष्ट केले आहे. अ आणि ब विभागा दरम्यानचे मध्यम वस्तीचे क्षेत्र हे ब विभागात येत आहे.

विकास हस्तातंरणाचे हक्क पुढील प्रमाणे देण्यात येणार आहेत जसे अ विभागातील हक्क हे ब किंवा क विभागात वापरता येतील आणि ब विभागातील विकासाचे हक्क फक्त क विभागातच वापरता येणार आहेत. तसेच क विभागातील विकासाचे हक्क फक्त क विभागात वापरणे बंधनकारक करण्यात आले आहे विकास हक्क वापरता त्या जमिनीचा विकास करावयाचा आहे तेथे त्या क्षेत्रफळाच्या त्या जागेचे क्षेत्रफळ अधिक त्या जागेच्या क्षेत्रफळाच्या 40% एवढे बांधकाम करता येईल. झोपडपट्टी पुर्नवसनासाठी लागणाऱ्या क्षेत्रफळाच्या अ विभागत 1:2 प्रमाणात ब विभागात 1:2.5 तर क विभागात 1:3 प्रमाणात विक्री योग्य बांधकामाचे क्षेत्रफळ मंजुर करण्यास येईल. मात्र झोपडपट्टीच्या पुर्नवसनासाठी 2.5 चटई क्षेत्राचे बांधकाम त्याच जागेवर करता येईल व उर्वरीत मंजुर चटई क्षेत्राचे विकास हक्कात हस्तांतरण करता येईल.

**झोपडपट्टया :**

घर ही मानवाची मुलभुत गरज आहे. दिवसें दिवस घराची वाढती मागणी घर बांधणीचा वाढता खर्च आणि जमीनीची भासणारी टंचाई यामुळे गोरगरिबांना आणि सामान्यानाही स्वतःचे घर हे एक स्वप्न रंजनच ठरले आहे. त्यामुळेच शहरातील झोपडपट्टयांचे प्रमाणे प्रतिदिन वाढतानाच दिसते. अशा वाढणाऱ्या झोपडपट्टयांना मुलभुत सेवा सुविधा पुरविणे देखील आवश्यकच आहे.

पुणे शहरातील झोपडपट्टी वासियांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून सध्या जवळपास साडेसात लाख लोंक झोपडया मधून रहात आहेत. सन 1997 मध्ये अस्तित्वातील एकूण 459 झोपडपट्टया पैकी, त्यातील 326 झोपडपट्टया ह्या अधिकृत म्हणून झोपडपट्टी निर्मुलन कायद्यानुसार घोषीत केलेल्या आहे.

**नैसर्गिक पर्यावरणाचे स्त्रोत :**

पुणे शहरात नैसर्गिक पर्यावरण स्त्रोत तीन भागात विभागले आहे ते म्हणजे वनस्पती, पाणस्थळ आणि टेकडया.

**झाडे :**

सन 1986 साली उद्योग विभागाने केलेल्या पाहणीनुसार पुणे म. न. पा. हद्दीत 5 लाख झाडे होती सन 1996 साली केलेल्या अलिकडच्या पाहणीनुसार पुणे म.न.पा.

हद्दीत जवळ जवळ 20 लाखांपेक्षा अधिक झाडे आहेत ह्या पाहणीवरुन असे लक्षा येते की लोकांची पर्यावरणा विषयी जाण वाढत आहे व तसेच वेगवेगळया सेवाभा संस्थांच्या प्रयत्नांमुळे शहरात झाडांची संख्या ती वाढत आहे. पुणे म.न.पा. इकोनेट ह संस्थेच्या सहाय्याने पुणे शहरातील झाडांची मोजणी करीत आहेत.

**जलाशय :**

पाषण तळे : पुणे महानगर पालीकेने मागील वर्षी पाषण तळयाच्या कडेला सुम 32,000 रोपे 20 हेक्टर क्षेत्रात लावलेली असून या वर्षी उर्वरीत 14 एकर क्षेत्रात झ लावण्याचे योजिले आहे. दरवर्षी बरेच स्थलांतरीत पक्षी या तळयाला भेट देत असल्य येथील निसर्ग सुधारण्यासाठी व पक्ष्यांचे प्रमाण वाढण्यासाठी रोपे लावण्याचा प्रकल्प उद्यान विभागाने हाती घेतला आहे येथे पक्षी अभयारण्य पण वसविण्याचा संकल्प महानगरपालीकेने केला आहे.

कात्रज तळे :

पुण्याच्या दक्षिण दिशेला पुणे सातारा मार्गा नजिक कात्रज तळे सुमारे 82 हेक्ट क्षेत्रात विस्तारलेले त्यातील 66 हेक्टर क्षेत्र म.न.पा.च्या ताब्यात आहे. म.न.पा.ने 65,000 झाडे 40 हेक्टर जागेत झाडे लावण्याचा प्रकल्प सुरु केला असूने लवकरच येथे एक प्राणी संग्राहलय उभारण्यात येणार आहे.

मॉडेल कॉलनी तळे :

पुणे शहराच्या मध्य वस्तीत मॉडेल कॉलनी तळे सुमारे 2.42 हेक्टर क्षेत्रात विस्तार आहे या तळयाचे महत्व पटवून देण्यासाठी परीसर आणि इकोनेट व इतर सेवाभा संस्था प्रयत्नशील आहेत. 1983 साली म.न.पा.ने या तळयाला कुंपण घातले व पाण्याचा धबधबा तयार केला होता. या तळयाचे सुशोभीकरण पुणे महानगरपालिके उद्यान विभागातर्फे केले गेले आहे.

**टेकडया :**

पुणे शहर हे सहयाद्री पर्वताच्या डोंगर रांगामध्ये वसले असल्या कारणाने श एक आगळे व्यक्तिमत्व लाभलेले आहे. पुर्वी शहरातील टेकडया डोंगर रांगा गर्द वन आच्छादीत होत्या त्यामुळे शहराचे हवामान आल्हाद दायक व आराग्यप्रद होते. वाढत्या शहरीकरणामुळे ह्या सर्व टेकडया उजाड झाल्या आहेत काही संस्थाच्या प्रयत्

आजही काही ठिकाणी टेकडयावरील हिरवाई टिकविण्याचा आणि वाढविण्याचा प्रयत्न केला जात आहे. तरीपण अनधिकृत झोपडपट्टया व बांधकामामुळे टेकडयांचे सौदर्य दिवसेंदिवस नष्ट होत आहे. आणि म्हणूनच पुणे म.न.पा.ने सर्व टेकडया ताब्यात घेऊन तेथे मोठया प्रमाणावर वनीकरण करणे गरजेचे आहे. तसेच बंद असलेल्या दगडाच्या खाणी देखील ताब्यात घेऊन तेथे जल उद्यान निर्मिती करावी असे सुचवावेसे वाटते.

## पाणी पुरवठा :

पुणे म.न.पा.च्या क्षेत्राचा विचार करता योग्य आणि पुरेसा पाणी पुरवठा करणे ही एक पर्यावरण दृष्या अवघड बाब आहे. (सन 1996 च्या कालावधीत शहरास 602 लक्ष लिटर एवढा पाणी दररोज पुरवठा केला गेला आहे. मुठा उलवा कालव्यातुन होणारा पाणी पुरवठा कालवा उघडा असल्यामुळे व बरचसा शहराअंतर्गत असल्यामुळे वारंवार प्रदुषित होत असतो तसेच गळतीमुळेही बरेच पाणी वाया जाते यासाठी खडकवासला ते जल पर्वती

केंद्र पर्यंत बंद पाईप लाइनचा प्रस्ताव मंजुर करुन घेण्यात आला आहे.

तसेच पुणे म.न.पा.ने पाणी पुरवठयाच्या दृष्टिने येणा-या अडचणाचा मागोवा घेतलेला आहे. पाणी पुरवठयात प्रामुख्याने कमी दाबाने पाणी पुरवठा होणारे भाग जुन्या जलवाहिन्यामुळे होणारी गळती आणि कमी क्षमतेच्या जलवाहिन्या ह्या अडचणी आहेत. पुणे म.न.पा.ने बेकर हिल आणि सुस येथील टेकडीवर पाणी साठवण टाक्याचे बांध काम हाती घेतलेले आहे. तसेच पाच प्रमुख जल वाहिन्याचे काम ही सुरु केलेले आहे. त्याच प्रमाणे दोन नवीन साठवण टाक्याचे बांधकाम व तीन टाक्याच्या सुधारणा केल्यामुळे पाणी पुरवठा पुरेसा आणि सुरळित होणार आहे. पाणी पुरवठयात आणखी पुणे
होण्यासाठी
सुधारणा

म.न.पा.ने पाणी पुरवठयातील अडथळे आणि अडचणीची पाहणी करणार असुन प्रत्यक्ष लोकांमध्ये जाऊन सर्वेक्षण पण करणार आहे. ज्यामुळे जास्तीत जास्त व शुद्ध स्वरुपातील पाणी पुणेकरांना पुरविणे शक्य होणार आहे.

पुणे म.न.पा.ने पुरेसा पाणी पुरवठा होण्यासाठी केलेल्या उपाय योजना, (बंद जल वाहिनी प्रकल्प) या प्रकल्पातंर्गत खडकवासला ते पर्वती जल शुद्धीकरण केंद्र ते कॅन्टोनमेंट पाशी पुरवठा केंद्रापर्यत 18 कि.मी. लांबीची पाईप लाईन टाकण्यास येणार आहे. या प्रकल्पाच्या दुसरा टप्याचे कामे सध्या सुरु आहे. या योजनेमुळे पाण्याची होणारी गळती थांबणार तर आहेच पण प्रामुख्याने कालव्याकाठी असलेल्या वसाहतीमुळे

होणारे पाण्याचे प्रदुषण पुर्ण पणे बंद होईल पर्वती जलकेंद्र येथे नवीन मुख्य जलवाहि टाकण्यात येत आहे. जेणे करुन शहरातील उंच भागात पुरेसा आणि सुरळीत पा पुरवठा केला जाईल अशा भागातील पाणी पुरवठ्याच्या वेळा एका आड एक ठे पुरेसा पाणी पुरवठा करण्यात येणार आहे. तसेच जुन्या जलवाहिन्या पुर्णपणे बदलु पाण्याची गळती थांबविण्यात येणार आहे.

**मलनिसाःरण व्यवस्था :**

शहरात विविध ठिकाणी मैला व सांडपाणी एकत्रीकरणाच्या योजना कार्यान्वि झालेल्या आहेत. पुणे शहरातील जवळपास 100% मैला या योजनेमुळे वाहुन नेला ज आहे. तरी पण मैला पाण्यावर प्रक्रिया व पुर्नवापरासाठी पुरेश्या सुविधा उपलब्ध नाहीत त्यामुळे उर्वरीत भागात सेप्टिक टॅक बांधणे आवश्यक आहे. मैला पाण्यावर प्रक्रिया व पुर्नवापराच्या सुविधे अभावि मुळा आणि मुठा नद्याचे पाणी प्रदुेषित होत असते. मल निसाःरण यंत्रणे मार्फत फक्त 22% मैला पाण्यावर प्रक्रिया करण्यात येते त्यासाठी नवीन योजना आखुन मलनिसाःरण यंत्रणा अधिक कार्यक्षम व वाढीव क्षमतेची कारणे *अत्यावश्यक आहे.*

**घन कचरा व्यवस्थापन :**

पुणे शहरात दररोज अंदाजे 1000 टन कचरा निर्माण होतो या मध्ये 25 कचर कोरडा तर 65 ते 70 ओला कचरा असतो 1000 टन कचया पैकी 100 टन कचर शहरातील 8 ते 10 हजार रॅगपिकर्स ब्दारे 100 टन कोरडा कचरा उचलला जातो 50 टन मार्केट यार्डतील व 50 टन भवानी पेठेतील कचयाची खाजगी संस्थाब्दा विल्हेवाट केली जाते. म.न.पा.चे दोन महत्वाचे कचरा डेपो आहेत 1 पौड रोड कचर डेपो (क्षेत्र 29 एकर) आणि 2 उरळी देवाची (क्षेत्र 8 एकर.)

म.न.पा.ने 300 ते 400 टन घन कचयाची विल्हेवाट लावण्यासाठी शहरा वेस्टर्न पॅक्स कंपनीशी सन 1996 साली करार केला असून, या योजने मार्फत कच-याचा पुर्नःवापर व उर्जा निर्मीती साठी उपयोग केला जाणार आहे. त्यास मार्गदर्शक प्रकल्प पौड रोड कचरा डेपो येथे उभारण्यात आला आहे. ह्या प्रकल्पाचे व सध्या थंडावले आहे.

## रस्ते, रहदारी आणि वाहतुक :

**प्रस्तावना :**

शहरातंर्गत होणारी सुरळीत वाहतुक आणि रहदारी शहरातील लोकाचे आणि शहराचे जीवन मान उंचावण्यास मदत करणे. अडथळे विरहीत सुरक्षित वाहतुकीमुळे शहरातील आर्थिक उलाढाली वाढण्यास तसेच मालाची ने आण व लोकांच्या चलनवलनास उपयुक्त होते.

शहरातील लोकांचे जीवनमान शहरातील वाहतुक व त्यासाठी केल्या जाणा-या उपाय योजना यावर अवलंबून असते. वाढत्या उत्पना बरोबर रस्त्यावरील वाहनाचे प्रमाण देखील वाढते.

वाढत्या शहरीकरणामुळे आणि दुय्यम दर्जाच्या वाहतुक व्यवस्थेमुळे शहरातील वाहतुक आणि रहदारी कोलमडून पडते. दिवसेंदिवस पुणे शहराला देखील अशा प्रकारच्या वाहतुक समस्यांना सामोरे जाणे भाग पडत आहे. याची प्रमुख कारणे म्हणजे वाढती लोकसंख्या, वाढती वाहन संख्या, घरापासून कामाच्या ठिकाणाचे वाढते अंतर व सार्वजनिक *वाहन व्यवस्थेचा वापर करण्यास असलेला लोकांचा अनुत्साह वगैरे होय.*

पेट्रोलवर चालणा-या वैयक्तिक दुचाकी वाहनाधारकाची संख्या लक्षणीय असुन, त्यात 1990 ते 1996 दरम्यान प्रचंड वाढ झालेली आहे. वाढती वैयक्तिक वाहन संख्या वाहतुकीस व रहदारीस अडचणीची ठरत आहे. शहरातील एकुण वाहनांच्या संख्येपैकी 75.65% एवढे दुचाकी वाहने, तर 13.29% वाहने जीप, कार्स आणि हलकी व्यापारी वाहने आहेत. वाहनाची वाढती संख्या ही शहरवासीयांच्या वाढलेल्या आर्थिक पात्रतेचे निर्देशक होय. ह्यांचेच प्रतिबिंब स्वयंचलित वाहन उद्योगाच्या वाढीत पडलेले दिसते. त्यामुळे बहुदेशीय वाहन उत्पादक कंपन्यानी भारतीय कंपन्या बरोबर वाहन उत्पादनसाठी करार केलेले आहेत.

ह्या सर्वामुळे वाहतुक आणि रहदारीचा प्रश्न, रस्त्याच्या रुंदीकरणाचे प्रश्न आणि योग्य वाहतुक यंत्रणा उभी करण्याचे प्रश्न, पुणे म.न.पा.स भेडसावित आहे.

प्रामुख्याने पुणे शहरातील वाहतुक ही रस्त्यावरुनच होते. पुणे म.न.पा.ने स्वतः

सार्वजनिक बस सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहेच. तरीपण दुचाकी वाहन संख्येत झालेली प्रंचड वाढ, लोंकाची सार्वजनिक बस सुविधे विरुद्ध असणारी मानसि यामुळे रस्ते वाहतुक आणि रहदारीचा प्रश्न कठीण होत आहे.

जनतेचा सार्वजनिक बस सुविधे विषयी असलेला अनुत्साह, वैयक्तिक वाहन स वाढीस, अपघातास वाहतुकितील अडथळयास तसेच वाहन तळाच्या समस्यस कारण होत आहे. पुणे म.न.पा.चा वाहन व्यवहार विभाग सार्वजनिक हित डोळयासमोर ठे सेवा पुरवित असतो तरी पण खाजगी वाहनांची वाढती संख्या रोखण्यास सार्वजनिक बस सुविधेचा वापराविषयी जनतेचा सहभाग वाढविण्यास त्यांना यश शकले नाही.

### अपघात आणि अपघाती मृत्यू :

मागील पाच वर्षाच्या (1993-97) पाहणी वरुन असे आढळून आले आहे की, 1995 साला खेरीज पुणे शहरात अपघाती मृत्यूचे व जखमी होण्याचे प्रमाण कमी आहे. पण उपलब्ध माहिती अनुसार एकुण अपघातापैकी पुणे - मुंबई मार्गावर हे अपघाताचे प्रमाण 23.75% तर पुणे सोलापूर रस्त्यावरील अपघाताचे प्रमाणे 7. एवढे आहे.

शहरातंर्गत होणा-या अपघातापैकी 60% अपघात प्राणघातक स्वरुपाचे असतात. मागील काही वर्षाच्या अहवाला वरुन असे दिसून येते की प्राणघातक अपघाताचे प्र सन 1993 ते 1996 दरम्यान 59.71% पासून 57.93% पर्यत कमी झाले आहे. काळजीचे कारण म्हणजे शहरात भीषण अपघाताचे प्रमाण सन 1993 - दरम्यानसाला 45.11% पासून 77.93% एवढे वाढले आहे.

अधिक साख्यिंकि विश्लेषणा वरुन असे लक्षात येते की 20% प्राणघातक अ रात्री 12.00 ते सकाळी 8.00 या काळात घडतात. वाहतुक विभागाने नविन योज अंतर्गत शहरात अधिकाधिक वाहतुक नियंत्रक दिवे बसविण्याचे काम पुर्ण केले तसेच शहरात अनेक ठिकाणी, एकेरी वाहतुक, पादचारी मार्ग, नवीन वाहन त निर्मीती, पे ॲन्ड पार्क योजना अंमलात आणल्या आहेत. शहरातील वाहतुक सु होण्यासाठी उड्डाण पुल अनेक मजली वाहन तळ, हातगाडी किंवा पथारीवाले वि रस्ते, अशा योजना म.न.पा. अंमलात आणत आहे, किंवा विचाराधीन आहेत.

तरी सुद्धा वरिल सर्व योजना लवकरात लवकर अंमलात आणणे व त्यांची कार्यवाही योग्य प्रकारे करणे अत्यंत आवश्यक आहे. त्याशिवाय शहरातील वाहतुकीत चांगल्या सुधारणा होणे अवघड वाटते.

## प्रदुषण संबधी सद्यःस्थिती

### हवेचे प्रदुषण :

शहरातील हवेचे प्रदुषण वाढण्याचे प्रमुख कारण म्हणजे वाढती वाहन संख्या व वाहनाच्या धुरावाटे बाहेर पडणारे दुषित वायुतील घटक म्हणजेच (प्रायमरी हैड्रोकार्बन, कार्बन मोनाक्साईड, नायट्रोजन डॉयाक्साईडस, ऑक्साईडस ऑफ सल्फर, डिझेल पार्टिकल्स व धुर इत्यादी) जे मानवी आरोग्यास घातक आहेत.

पुणे शहरातील हवेच्या वाढत्या प्रदुषणास प्रामुख्याने दुचाकी वाहने, तीन चाकी रिक्षा तसेच 6 सिटर रिक्षाची वाढती संख्या कारणीभुत आहे ज्यामुळे एकूण प्रदुषणापैकी जवळजवळ 70% प्रदुषण हे वरिल प्रकारच्या वाहनामुळे होत असते तसेच पेट्रोल वाहनाच्या तुलनेत डिझेलवर चालणारी वाहने कार्बन मोनाक्साईडचे प्रमाण 100 पटीने जास्त प्रदुषण वाढवतात त्यामुळे डिझेलवर चालणा-या वाहनावर मागील वर्षी रमझानी इन्स्टिट्युट ऑफ ऑक्युपेशनल हेल्थ सर्व्हिसेसच्या पथकाने पुण्यातील चार विशिष्ट ठिकाणच्या हवेच्या प्रदुषणाचा अभ्यास केला होता यावर्षी जानेवारी 1997 या महिन्यात पुणे विद्यापीठाच्या पर्यावरण शास्त्र विभागाच्या पथकाने पुण्यातील हवेच्या प्रदुषणाचा अभ्यास केलेला आहे. तसेच मशाल संस्थेने देखील जुलै 1997 मधे अशाप्रकारे हवेच्या प्रदुषण संदर्भात पाहणी व अभ्यास केला होता सदरिल पहाणीतुन व अभ्यासातुन असे निष्कर्ष आले आहेत की मागील वर्षी पेक्षा यावर्षी हवेतील प्रदुषणाची पातळी काही ठिकाणी 3 पटीने वाढलेली आहे याचे एक प्रातिनिधीक उदाहरण म्हणजे पौड फाटा येथील हवेची प्रदुषण पातळी जी मागील वर्षी मान्य मानका पेक्षा 130 मायक्रो ग्रॅम प्रति घनमीटर अधिक होती आज त्याच ठिकाणची प्रदुषण पातळी 2222 मायक्रोग्रॅमे प्रतिघनमीटर ऐवढी आहे, म्हणजेच पौड फाटा येथील प्रदुषण पातळी मान्य मानका पेक्षा 1722 मायक्रोग्रॅम प्रतिघनमीटर जास्त असुन, त्यात मागील वर्षी पेक्षा कित्येक पटीने वाढ झालेली आहे.

## जलप्रदुषणः

पाण्याच्या प्रदुषणाचे मुख्य कारण म्हणजे शहरातील बरेचसे मैलापाणी त्यावर प्र न करता नदीत सोडले जाते तसेच नदीच्या किनाऱ्यावर बऱ्याच ठिकाणी झोप झाल्या आहेत औद्योगिक सांडपाणी सुध्दा योग्य प्रक्रीये शिवाय नदीत टाकले जाते त्याचे प्रमाण तसे कमी आहे. दुषित पाण्यामुळे शहरवासीयांच्या आरोग्यावर परीणाम होतो. मुळा-मुठा नदीतील पाण्याच्या प्रदुषणाची पातळी अभ्यास महत्वाच्या ठिकाणी नमुने घेऊन त्यांची तपासणी इम्पॅक्ट इंडिया, थरमॅक्स व विद्यापीठातर्फे अेप्रील महिन्यात करण्यात आली आहे. तपासणी अंती असे आले की नद्यांचे पाणी फक्त शेती साठीच चालेल असे आहे परंतु पिण्यासाठी अजिबात उपयोग करु नये. मशाल संस्थेने ह्याच विषयावर जुलै महिन्यात पावस नदीच्या पाण्याचा अभ्यास केला व वरील प्रमाणेच निष्कर्ष मिळाले. भूजल अभ्यास करता जमीनीखालील पाण्यात कॅल्शीअम, मॅग्नेशीयम व पोटॅशीयमचे वाढत्या डीटर्जटच्या वापरामुळे वाढलेले दिसले. शहराचा बराच मैला प्रक्रिया न पुढे जात असल्याने जमीनीतील पाण्याचे प्रदुषण वाढत आहे. पुण्यातील तला अभ्यास करता परीस्थिती बिघडत चाललेली लक्षात आले बीओडी व सीओडीचा प्रमाणामुळे जलचरणाचे आयुष्य धोक्यात आले आहे कात्रज तलावाचे पाणी अे पिण्यासाठी वापरले जायचे परंतु सध्याच्या परीस्थितीत ते पिण्यायोग्य राहीले नाही वर्षी हजारो माशांचा जीव त्यामुळे गेला होता.

## ध्वनि प्रदुषण :

भारतातील बहुतेकरुन मुख्य शहरामध्ये ध्वनी प्रदुषणाचे मुख्य कारण वाहतुकीचे वाढते प्रमाण हे आहे. पॉवर स्टेशन, रेल्वे लाईन, उद्योग धंदा, क्षेत्रात ध्वनी प्रदुषणाचे प्रमाण जास्त असते मोठया व जास्त प्रमाणात ध्वनी माणसाला बहिरेपण येऊ शकते.

जुलै महिन्यात मशाल संस्थे तर्फे शहरातील काही प्रमुख वाहतुक कोंडीच्या ध्वनी प्रदुषणासंबधी नमुना पाहणी केली असता असे आढळून आले की ध्वनी प्रमाण महाराष्ट्र प्रदुषण विभागाच्या मान्य प्रमाणापेक्षा 1.5 पट अधिक आहे वि पौड फाटा, बंडगार्डन रोड, सिटी सर्व्हे ऑफिस चौक, म्हात्रे पुल या ठिकाण प्रदुषण पातळीत अत्याधिक वाढ झाल्याचे दिसुन येते.

या अभ्यासाव्दारे पुणे शहरातील इस्पितळे, शैक्षणिक संस्था, धार्मिक स्थळे यांच्या सभोवतालच्या 100 मिटरचा परिसर ध्वनीमुक्त ठेवावा अशी सुचना करण्यात येत आहे. अकारण हॉर्न वाजविणे व जड वाहनांना दिवसा शहरातील रस्त्यावर प्रवेश बंदी करणे व तसे न केल्यास त्यावर दंड आकरणे, वाहतुकिच्या नियमाची कडक अंमलबजावणी करणे, अकारण वाहतुकित अडथळे किंवा खोंळबा येणार नाही असे पाहणे अशा प्रकारच्या उपाय योजना केल्यास ध्वनी प्रदुषण कमी होण्यास मदत होईल असे वाटते.

**सार्वजनिक आरोग्य :**

आरोग्य : आनंदी, काळजीमुक्त आरोग्य मानवाचा मुलभुत हक्क म्हणुन मान्य करण्यात आलेला आहे. सार्वजनिक आरोग्य हे कुठल्याही धार्मिक, राजकीय, आर्थिक, आणि सामाजिक बंधनापासुन मुक्त असणे अविवार्य आहे.

सन 1996 या वर्षात दुषित पाण्यामुळे पुणे शहरातील शेकडो लोंकाना रोगराईचा सामना करावा लागला आहे शहारातर्गत वाहणाऱ्या नद्या प्रदुषित झालेल्या असल्यामुळे त्यांचे पाणी मानवी वापरास योग्य राहिलेले नाही.

मागील वर्षात डायरीया लागवण आणि गॅस्ट्रोची लागण झालेल्या रोग्याच्या संख्येत 435 वरुन 636 पर्यंत वाढ झालेली आहे. काविळीच्या रोग्यांची सख्या मात्र 17 पासून 12 वरती आली आहे. तसेच हवे व्दारे फैलावणाऱ्या रोगामुळे मरण पावणाऱ्याची संख्या 123 एवढी नोंदली गेली आहे.

जागतिक तुलनेत एडस ग्रस्त (एच,आय,व्ही लागण झालेले) रोग्याची संख्या पुणे शहरात अधिकच आहे. पुणे शहरात 50,000 रुग्ण एच,आय,व्ही, लागण झालेल आहेत राज्यातील प्रमुख तीन शहरापैकी पुणे हे एक प्रमुख एडस ग्रस्त रुग्ण असलेले शहर आहे. इतर दोन शहरे म्हणजे मुंबई व सांगली.

डॉ. कोटणीस रुग्णालयाच्या पहाणीनुसार एच,आय,व्ही, लागण झोलेल्या रुग्णाची संख्या सन 1989 च्या तुलनेत 13.6% वरुन 22.5% एवढी वाढलेली आहे. 70% ते 80% वेश्या ह्या एच, आय,व्ही, ग्रस्त असल्याचे त्वचा रोग तज्ञाच्या पहाणीतुन दिसून आले आहे. तसेच 10 टक्के रुग्ण हे उच्चभ्रु वर्गातील आहेत.

पुणे म.न.पा.ने एडस प्रतिबंधक उपाय योजना नॅशनल एडस रिसर्च इन्स्टिटयुटच्या सहकार्याने 1987 पासून चालविलेली आहे.

मागील वर्षी कॉलऱ्याच्या रुग्णात देखील वाढ झालेली आहे. पण कॉल
दगावल्याची नोंद झालेली नाही. पण गॅस्ट्रोमुळे मृत्यू पावलेल्याची वाढती सं
ही एक धोक्याची घंटाच वाजत आहे असे वाटते 1995 सालात शहराती
प्रमाण अत्यल्प होते त्यामानाने सध्या रोगराईचे प्रमाण खुपच आहे. त्यामु
रक्षणाची आणि रोग प्रतिबंधक बाबीची काळजी घेणे आवश्यक झाले आहे

सन 1996-97 ह्या सालात क्षयरोगाची बाधा असलेले 887 रुग्ण आ
असून 2175 रुग्णांवर उपचार केले जात आहेत.

**स्वच्छ पुणे मोहिम :**

महानगरपालिके तर्फे सुरत शहरातील स्वच्छते संबधी झालेल्या प्रगति
करुन लोकांच्या सहकार्याने पुणे शहर स्वच्छता मोहिम हाती घेण्यात आली

**कचऱ्या संबधी धोरण :**

पाणी विरहित कचरा व पाण्याचा भाग असलेला कचरा सुरवातीलाच
गोळा करण्यासंबधी व ओला कचरा खत निर्मीतीसाठी वापरण्याचा प्रयोग
आहे ठराविक कचरा गोळा करुन त्याचा पुर्न उत्पादनासाठी वापर करण्यात
कचरा गोळा करणऱ्याना सहभागी करुन घेण्यात येत आहे.

**हॉस्पिटल मधील कचरा :**

हॉस्पिटलचा कचरा आरोग्याच्या दृष्टीने घातक असल्याने कचरा जाळून
योजना हाती घेण्यात येत आहे.

**दंडात्मक कार्यवाही :**

घरातील तसाच उद्योगधंद्यातील कचरा सार्वजनिक जागी टाकण्यात
पर्यावरणासंबधी अडचणी निर्माण होतात. अशा गोष्टी व रस्त्यावर थुंक
बाबतीत दंड आकारण्यात येत आहे.

**इस्पितळामध्ये निर्माण होणारा कचरा :**

मोठया इस्पितळांनी, म्हणजेच 100 पेक्षा अधिक खाटांची साय असणाऱ्या इ
आपल्याकडील निर्माण होणाऱ्या घन कचऱ्याची व्यवस्था स्वतःच ईन्सिनेरेटर व

असा कायदा म.न.पा.ने केला आहे. छोटया इस्पितळासाठी म.न.पा.ने कैलाश स्मशान भूमी येथे 50 कि.ग्रॅ./ तास क्षमतेच्या एका ईन्सिनेरेटरची सोय केली आहे.

**कत्तलखाना :**

पुणे म.न.पा.ने अस्तित्वात असलेल्या कत्तलखान्याचे आधुनिकरण करण्याचे योजिले आहे. या नियोजित योजनेचा अंदाजे खर्च रु 8 कोटी असून यापैकी 10 लाख रुपये केंद्र शासन कडून मंजूर झाले आहे.

म.न.पा.चा मांजरी येथे आणखी एक आधुनिक कत्तलखाना उभारण्याचा प्रस्ताव असून, याबाबत आराखडा तयार करुन केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठविलेला आहे. या कत्तलखान्यात दररोज 40 मोठी जनावरे व 250 लहान प्राणी कत्तल केले जातील असा अंदाज आहे.

**म.न.पा.ने योजिलेले नविन प्रकल्प :**

**मृत प्राण्याची विल्हेवाट यंत्रणा :**

उरळी येथे मृत प्राण्याच्या विल्हेवाटीसाठी एक प्रकल्प राबविला जाणार आहे. सध्या हा प्रकल्प प्राथमिक अवस्थेत असून, केंद्र शासना सोबत म.न.पा.चा विचार विनिमय चालु आहेत.

**गांडूळ खत निर्मिती :**

स्वच्छ पुणे प्रकल्पातर्गत पुणे म.न.पा.ने गांडूळ खत निर्मिती प्रकल्प सुरु करण्याचे ठरविले आहे. त्यासाठी सार्वजनिक उद्यान व बालगंधर्व रंगमंदिरा जवळील मोकळया जागेचा वापर करण्याचे ठरविले आहे.

**विद्युत दाहिनी :**

पुणे म.न.पा. कोथरुड येथे एक विद्युत दाहिनी उभारणार आहे.

## मुठा नदी पात्र सुधार योजना :

पुणे म.न.पा.ने मुठा नदीच्या पात्रची सुधारणा करण्याचा कार्यक्रम 10 व
हाती घेतलेला आहे. नदीच्या पात्राचा होणारा ऱ्हास थांबण्यासाठी अशी योजन
आवश्यक आहे.

या योजनेनुसार 110 मी रुंदीचे नदीपात्र नदीच्या मध्य भागातुन बांधण्य
आहे. त्यासाठी पात्राच्या दोन्ही बाजूस तळापासून 2 मी. उंचीची भिंत बांधल
आहे. ज्यामुळे नदी पात्रातील पाणी वाहते राहिल पानशेत व खडकवासला
तसेच वरसगांव धरणाचे बांधकाम पुर्ण झाल्यामुळे मुठा नदीतुन वाहणारे पाणी
कमी असते. एवढेच नव्हे तर पावसाळयातही नदीला पुरेसे पाणी नसते. नदी
केलेल्या बांधकामामधुन जवळपास 10,000 क्युसेक्स पाणी वाहून जाऊ शकण
जर पावसाळयात पुरामुळे पाण्याची पातळी 2 मी. पेक्षा अधिक वाढलीच तर
पाणी नदीच्या पुर्ण पात्रातुन वाहुन जाऊ शकेल. निरिक्षणात असे लक्षात आ
की जरी धरणातील जास्तीचे पाणी नदीत सोडण्यात आल्याने
निर्माण झाली तरी, असे वर्षाकाठी फार तर 15 ते 25 दिवसच पाणी पातळी
पेक्षा जास्त असते. वर्षातील इतर काळात नदीतील पाणी प्रवाह अगदी क्षीण
असा क्षीण प्रवाह काठाने वाहणा-या सांडपाण्यामुळे सतत प्रदुषित होत असते
पाणी व नदी पात्रातील स्थिती त्यामुळे सार्वजनिक आरोग्यास घातक होण्या
आहे. त्यामुळे मैला सांडपाण्याची योग्य व्यवस्था करणे देखील अत्यावश्यक

या योजनेनुसार नदीच्या बांधीव पात्रा खेरीज ऊर्वरीत दोन्ही बाजुच्या मोकळ
12 मी रुंदीचा रस्ता दोन्ही काठाने बांधावयाचा आहे. या रस्त्याचा उपयोग
आणि सायकल मार्ग म्हणून होणार आहे. नदी पात्रातील उर्वरीत भागात
प्रमाणावर वृक्ष लागवड केली जाणार आहे. त्यामुळे नदीचे पात्र हिरवे गार त
आणि नदीची शोभा देखील वाढणार आहे. पादचाऱ्यांना आणि सायकल स्वारांना
वातावरणातून आल्हाददायक प्रवासाचा आनंदही उपभोगता येईल. त्याच वेळी
रहदारी वरील ताण ही काही अंशी कमी होणार आहे.

## नदी सुधार योजनेची सद्यःस्थिती :

नियोजित योजनेनुसार 50 मी रुंदीचे आणि 1.5 कि.मी लांबीचे नदी प
पुर्ण झाले आहे तसेच 110 मी रुंदीच्या पात्राच्या दोन्ही बाजुकडील भिंत
3.2 कि.मी लांबी पर्यंत पुर्ण केले गेले आहे. डिंसेंबर 1996 पासुन नदी पात्रा

उपसणे, नदी पात्रास योग्य उतार काढणे, पात्राची स्वच्छता करणे इत्यादी कामे पुर्ण झाली आहेत. त्यानुसार नदीच्या पात्रातील 4 लक्ष घनमीटर एवढा गाळ उपसण्यात आला. योजनेनुसार आज पावेतो 20% काम पुर्णत्वास गेले आहे. याच योजनेचा भाग म्हणुन नदी पात्रात मोठया प्रमाणावर वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे.

या योजनेनुसार पुणे म.न.पा.ने संपुर्ण नदी पात्राच्या सुधारणेचा भव्य कार्यक्रम हाती घेत आहे. असा आराखडा तयार करुन घेण्यासाठी पुणे म.न.पा.ने खुली स्पर्धा देखील आयोजित केली होती. त्यानुसार पुणे रिव्हर ग्रुप यांनी बनविलेला नदी सुधारणेचा आराखडा स्विकारण्यात आला आहे. या नवीन आराखडयानुसार नदी सुधार कार्यक्रमाचा खर्च अंदाजे रु. 130 करोड ऐवढा अपेक्षित आहे. या योजनेत नदी काठानें रस्ते बांधणे, उद्यान तयार करणे, वृक्षारोपण, नदीस लागुन असणाऱ्या जागेत भराव घालणे, अशा जागेचा वापर व्यापारी कारणासाठी करणे, सार्वजनिक उपक्रमासाठी उदा. वाहन तळ जागा उपलब्ध करणे, करमणुक केंद्र स्थापन करणे इत्यादी कामे समाविष्ट केलेली आहेत.

## जलद शहरी पर्यावरण समीक्षा[1] :

पर्यावरणासंबधी अभ्यास करण्याच्या पद्धतीत जलद शहरी पर्यावरण समीक्षा तंत्राचा वापर करण्यात आला आहे. ह्या तंत्रात पर्यावरणाच्या महत्वाच्या निर्देशकांस अनुसरुन सध्याची माहिती गोळा केली जाते व त्याचा अेकमेकांशी असलेल्या परस्पर संबधाचा अभ्यास करुन सद्यःस्थितीचा प्रत्येक निर्देशांकाचा गुणांक दिला जातो. जास्त गुणांक असणाऱ्या निर्देशांकासंबधी गंभीरपणे विचार करणे अत्यंत आवश्यक ठरते. सदर तक्त्याप्रमाणे पुणे शहराचा सर्वात महत्वाचा पर्यावरणासंबधी निर्देशांक हवेचे प्रदुषण, पाण्याचे प्रदुषण व झोपडपट्टयाच्या समस्या हे होत

ह्या तंत्राामध्ये प्रत्येक निर्देशांकाचा कार्यकारण संबध अभ्यासला जातो. दिलेल्या गुणांकावरुन कोणत्या बाबतीत महानगरपालिकेने त्वरीत पाऊल उचलले पाहिजे हे कळते. सोबत जोडलेल्या जलद शहरी पर्यावरण समीक्षा तक्त्यावरुन पुढील येणाऱ्या काळात पर्यावरणा मध्ये सुधारणा किंवा त्यामध्ये जास्त बिघाड होऊ न देण्याचे काम करावयाचे हे स्पष्ट होते. महानगरपालिकेच्या प्रयत्ना बरोबरच पर्यावरणा संबधी आम जनतेचा सहभाग व त्यासंबधी जाणीव वाढवणे अत्यावश्यक आहे.

या पर्यावरण अहवालाच्या विस्तृत प्रती जनतेसाठी, पुणे म.न.पा. आणि मशालच्या कार्यालयात विक्रीसाठी ठेवण्यात आलेल्या आहेत. या पर्यावरण अहवालाचा मा. नगरसेवक, म.न.पा.चा अधिकारी वर्ग तसेच समस्त पुणेकर नागरिक परिपुर्ण उपयोग करतील व पुणे शहरास लाभलेले नैसर्गिक वरदान नष्ट होणार नाही याची काळजी घेतील ही अपेक्षा.

दि. 30 जुलै 1997.

आयुक्त,
पुणे महानगरपालिका
पुणे.